सदरक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उप आयुक्त(अभियान),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५८१८
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक : २४/०५/२०२३

# प्रेस नोट

बृहन्मुंबई शहरात दि. २३/०५/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कायदयान्वये पोलीस ठाणे अभिलेखावरील आरोपीच्या विरोधात कारवाई करण्याकरीता दैनंदीन विशेष मोहिम राबविण्यात आली. सदरची मोहिम पोलीस आयुक्त, श्री विवेक फणसळकर, विशेष पोलीस आयुक्त श्री.देवेन भारती, पोलीस सह आयुक्त (का. व सु.) श्री. सत्य नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे राबविण्यात आली आहे. मुंबई शहरातील सर्व पाचही प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त, १३ परिमंडळीय पोलीस उप आयुक्त तसेच सर्व विभागीय सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यासह सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी एकत्रित सर्व मुंबई शहरात कार्यवाही केली.

प्रस्तुत मोहिम वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शाळा, महाविद्यालये, महत्वाची ठिकाणे, रेल्वे स्टेशन परिसर, मार्केट परिसर, निर्जनस्थळे, धार्मिक स्थळे, गर्दीची/वर्दीची ठिकाणे, गार्डन्स इ. ठिकाणी तसेच गोपनीय माहितीच्या आधारे अंमली पदार्थांच्या विक्री व सेवनावर प्रतिबंध करुन अंमली पदार्थ मुक्त मोहिम राबविली आहे.

प्रस्तुत मोहिमेअंतर्गत मागील २४ तासात एनडीपीएस कायद्यान्वये खालील प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| अभिलेखावरील तपासलेले आरोपी | अटक आरोपी | दाखल गुन्हे (एकुण ७) | | | जप्त केलेला अंमली पदार्थ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गांजा | एमडी | ब्राऊन शुगर | गांजा | एमडी | ब्राऊन शुगर |
| ३२३ | ७ | ३ | ३ | १ | ४३८ ग्रॅम | १८०.७० ग्रॅम | ४ ग्रॅम |

| कोप्टा कायद्यांतर्गत कारवाई | अनधिकृत पान टपरींचे निष्कासन | अनधिकृत फेरीवाले कारवाई | रेल्वे स्थानकाजवळील अनधिकृत फेरीवाले |
|---|---|---|---|
| २११ | १७ | २६५ | ८९ |

गेल्या २४ तासांत कस्तुरबा मार्ग पो. ठाणे येथे ४ ग्रॅम ब्राऊन शुगर तसेच ताडदेव पो.ठाणे येथे ६७.६६ ग्रॅम, भायखळा पो. ठाणे येथे ६० ग्रॅम, सायन पो. ठाणे येथे ५३.०४ ग्रॅम एमडी हे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

मागील ३० दिवसांत मुंबई पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये एकुण ३६२ गुन्हे दाखल करुन ३७७ आरोपींना अटक केलेली आहे. कोप्टा कायद्यान्वये एकुण ११८९७ कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच १९६१ अनधिकृत पानटपऱ्यांचे निष्कासन करण्यात आले असून एकुण १०९०५ रस्त्यांवरील अनधिकृत फेरीवाले व ४४५५ रेल्वे स्थानकाजवळील अनधिकृत फेरीवाले यांचेवर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदरची मोहिम यशस्वीपणे राबविण्यात आली आहे. तसेच यापुढे देखील सदरची मोहिम राबविण्यात येत आहे.

-o-o-o-